# राशिभविष्य - जून, २०१९.

दादा दामले ( dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष** - या राशीच्या प्रथम स्थानी हर्षल सारखा विक्षिप्त ग्रह असल्यामुळे या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अतिशय अस्थिर, चंचल, लहरी, अहंकारी असा झाला असण्याची शक्यता वाटते. तसे असेल तर कोणी चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या, किंवा उपदेश केला, धाक दाखवला तर तो अपमान वाटून असह्य संताप येत असला पाहिजे. या राशीची लहान मुले तर सध्या अत्यंत व्रत्य, खोडकर झाली असणे संभवते. पण या स्वभावाला प्रयत्नपूर्वक लगाम घालू शकलात तर शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखसमाधान अनुभवू शकाल. असे असले तरी हा हर्षल ग्रह उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल , प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात अस्वस्थ मनस्थिती, आर्थिक चिंता, वाद, भांडणे, शत्रुत्व निर्माण होणे संभवते. मंगळ ग्रह अनुकुल असल्यामुळे महत्त्वाकांक्षा वाढेल. हातून कर्तबगारी घडेल. पण कधी तरी दुखापत होणे संभवते. जपा. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे परिस्थिती आटोक्यात राहील. आर्थिक लाभ होतील. पण काही मंडळींना डोळ्याच्या अनारोग्याचा त्रास होणे संभवते. तसेच विविध कारणांनी काहींच्या बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या चतुर्थ स्थानी आल्यावर मात्र प्रतिकुल होईल व कुटुंबात वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता दिसते. जपा. पण बुधामुळे मित्रसुख मिळेल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे प्रवासाचे योग येतील. याच स्थानी असलेल्या केतूमुळे “वरून कीर्तन, आतून तमाशा” असे धूर्त आचरण होणे संभवते. तसेच या केतूमुळे काहीही कारणाने संतति सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. अशा परिस्थितीत कुमार्गी मित्रांपासून सावध राहा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर २१ वेळा “ ओम गं गणपतये नम: “ मंत्राचा जप करा. तसेच रात्री झोपण्यापूर्वी “ श्रीहनुमानचालिसा” स्तोत्राचे पठण करा.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. व्यय स्थानी असलेल्या हर्षलमुळे सांपत्तिक अडचणी येतील, काही मंडळींना वाईट प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. इतकेच नव्हे तर काही मंडळींना जिवावरच्या प्रसंगाशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता आहे. काहींना बेअब्रूच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. जपा. हा हर्षल अकारण शत्रुत्व निर्माण करील. रवि -राहू हे दोन्ही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने कौटुंबिक जीवनात वाद, आर्थिक चिंता, आर्थिक नुकसान, शारीरिक-मानसिक अनारोग्य बळावणे, अशापैकी घटना घडणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार अशासारखे आजार असणारांनी मन व विचारशक्ती शांत व स्थिर राखण्याचा सतत प्रयत्न करावा. अशा प्रतिकुल परिस्थितीत बुध -शुक्र ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल.

महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर मन खंबीर बनेल, धैर्य वाढेल, महत्त्वाकांक्षा वाढेल व हातून थोडी कर्तबगारी घडेल. पण या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनि -केतुमुळे अपेक्षाभंग होणे, असमाधानकारक घटना घडणे, काहीही कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे, अपघात होणे, असे काही घडू शकेल. जपा. पण या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते घट्ट होतील. काही मंडळींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. काहींना प्रवासयोग येईल. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या नेपच्यून ग्रहामुळे नोकरी व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होणे संभवते. पण हा नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापारी यांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल, व मन:शक्ती प्राप्त होईल आणि मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर श्रद्धेने एक माळ " ओम ! नम: शिवाय " मंत्राचा जप करा. तसेच रात्री झोपण्यापूर्वी "हनुमानचालीसा " स्तोत्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या महिन्याच्या संपूर्ण काळात या राशीच्या मंडळींना शारीरिक-मानसिक अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. त्यामुळे काही मंडळींना गहिरे नैराश्य येण्याची शक्यता आहे. अकारण अपमान होणे, सूडबुद्धी प्रबळ होणे, वातविकाराचा आजार बळावणे, धननाश होणे, चंचल मनस्थितीमुळे मित्रद्रोह होणे, कुसंगतीचा त्रास सहन करावा लागणे, हट्टी, अहंकारी स्वभाव व मानापमानाच्या अवास्तव कल्पना यांमुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचा आजार त्रस्त करणे, गलितगात्र थकवा येणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे काही मंडळींना डोळ्याच्या अनारोग्याचा तर काहींना मान, घसा, दाढा दुखण्याचा आजार अस्वस्थ करील. जपा. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी तर सतत मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून तसेच सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. त्यामुळे गुरु-शुक्रासारख्या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद घेऊ शकाल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला गुरु ग्रह नोकरीव्यवसायातील प्रगतीस पूरक होईल व गंभीर असे अनारोग्य होऊ देणार नाही. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शनि -केतू ग्रहांमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच काही मंडळींची मनस्थिती अस्थिर, चंचल झाल्यास त्यांच्या मनात कपटी विचार प्रबळ होणेही संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला नेपच्यून ग्रह अध्यात्मात रस असणारांना अनुकुल होईल व उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडणेही संभवते. तसेच काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळू शकेल. विक्षिप्त स्वभावाच्या हर्षलमुळे मित्रांशी भांडणे होणे संभवते. जपा. पण शुक्र ग्रह पूर्णपणे अनुकुल असल्याने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील, अर्थलाभ होईल व मन:शांती लाभेल. श्रद्धा असेल तर कुलदैवताची व श्रीमहालक्ष्मीची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(४) कर्क -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. त्यामुळे त्यांना जे काय साध्य करावयाचे आहे ते त्यांनी महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. या राशीच्या काही मंडळींना मानाचे स्थान, एखादे उच्च पद असे काही मिळणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात

विरोधी परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. त्यामुळे मानसिक स्थिती अस्वस्थ होणे संभवते. व्यवसाय स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. तसेच स्वतंत्र व्यवसाय असणारांनाही काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. शनि ग्रहही स्वतंत्र व्यवसाय असणारांना पूरक होईल. पण तो अनारोग्यकारक असून त्याच्यामुळे गैरसमज, भांडणे, शत्रुत्व निर्माण होणे संभवते. जपा. व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. पण याच राहूमुळे हितशत्रूंपासून रक्षण होईल, काही मंडळींना अर्थलाभ होणे संभवते; तर काही मंडळींना परदेशगनाची संधी मिळेल. मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून त्याच्यामुळे वाद, भांडणे, मानहानी, आर्थिक चिंता अशा प्रकारचे त्रास सहन करावे लागण्याची शक्यता आहे. हट्टी स्वभाव, स्वतः:संबंधीचा मीपणा यांवर नियंत्रण राखू शकलात तर अकारण दगदग, श्रम, शरीरपीडा होणार नाही व त्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्यही उत्तम राहू शकेल. बुध ग्रहामुळे काही मंडळींना मित्रद्रोहाचा त्रास सहन करावा लागेल; तर काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. सर्व सुख मिळेल. काहींचे प्रेमसंबंध जुळून येतील. या राशीच्या ज्या गर्भवती स्त्रियांचा य महिन्यात प्रसूति काळ आहे त्यांना पुत्रप्राप्ती होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला नेपच्यून ग्रह जल भय , विषभयकारक असल्यामुळे जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे”चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळींना बढती, काहींना पगारवाढ, काहींना एखादे मानाचे स्थान तर क्वचित कोणास एखादे उच्च पदही मिळू शकेल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांनाही काळ अनुकुल असून त्यांना आपल्या संशोधन कार्यात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. या राशीच्या दशम स्थानी स्वराशीचा शुक्र ग्रह असला तरी त्याच्यामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या मार्गात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यून ग्रहामुळे वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. तसेच राहू-केतू मुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. पण राहूमुळे काही मंडळींना एखादे अधिकारपद मिळणार असले तरी त्याचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याचा प्रयत्न होणार नाही याची त्यांनी काळजी घ्यावी. नपेक्षा “होत्याचे नव्हते होण्यास “ वेळ लागणार नाही. या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणे संभवते. पण नवे मित्र मिळाले तरी त्यांच्याशी वितुष्ट येणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या केतू ग्रहामुळे विविध कारणांनी या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होणे संभवते. जपा. तसेच काही मंडळींना पोटाच्या अनारोग्याचा आजार त्रस्त करील. या राशीच्या पंचम स्थानी गुरु ग्रहाच्या धनु राशीत असलेला शनी ग्रह आळस न करता, केवळ दिवास्वप्ने न पाहता चिकाटीने परिश्रम करणारांना यशदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ -बुध हे दोन्ही शत्रू ग्रह या राशीच्या व्ययस्थानी जात असल्यामुळे नियोजित कार्यात अपयश येणे, मानहानी होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे, घरीदारी वाद, भांडणे होणे, अनारोग्याचा त्रास होणे, असमाधानकारक घटना घडण्याची दाट

शक्यता दिसते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे काही मंडळींचे स्थावर खरेदी -विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार घडून येतील. कौटुंबिक सुख व गृहसौख्यही मिळू शकेल, पण नातलग मंडळींपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर एक माळ पुरुषांनी " ओम नम: शिवाय" आणि स्त्रियांनी "ओम शिवाय नम: "मंत्राचा जप करावा. तसेच रात्री झोपण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. काहीना फसवणूक झाल्याचा विचार अस्वस्थ करील. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनि -केतू ग्रहांमुळे घरात कोणाशी पटणार नाही त्यामुळे गृहसौख्यात बाधा येईल. जपा. काही मंडळींना मातेच्या आजाराची चिंता त्रस्त करील. विष भय असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल , यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळींना अधिकार पद, प्रतिष्ठा प्राप्त होईल तर काहींना थोरामोठयांच्या ओळखीचा लाभ होईल व अशा ओळखीतूनच प्रगतीच्या संधी मिळू शकतील. पण महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठांचा कोप, मानहानी होणे संभवते. मंगळ -बुध हे शत्रु ग्रह व्यवसाय स्थानी एकत्र असल्यामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. पण औषधविक्रेते, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत सुधारणा होईल. काही मंडळींना एखाद्या मौल्यवान गोष्टीचा लाभ होईल, काहींना नवे मित्र मिळतील; पण जुन्या मित्रांच्या मैत्रीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. शुक्र ग्रह पूर्णपणे अनुकुल असून ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांपैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते.

काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. या शुक्रामुळे काही मंडळींना गुरुकृपा, थोरकृपा, कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे अपघात भय असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. वाहन वेगाने चालवू नका, विचाराच्या तंद्रीत रस्त्याने चालू नका. गुरु ग्रह या राशीच्या लेखक मंडळींना अनुकुल असून या राशीच्या काही लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होऊ शकेल. पण या गुरु ग्रहामुळे भावंडांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची व श्रीगणेशाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान करून २१ वेळा "ओम गं गणपतये नम::" मंत्राचा जप करा. तसेच " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे"चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ प्रतिकुलच आहे , असे म्हणावे लागते. त्यात सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय भावनाशील झाली असल्यास त्यांना गहिरे नैराश्य येणे संभवते. रवि ग्रह प्रतिकुल असल्याने इच्छा आकांक्षा अपूर्ण राहतील. हाती घेतलेल्या कामात अडथळे, अडचणी, अपयश येईल. वाद, भांडणे होतील. रोग प्रतिकारशक्ती कमी झाल्यामुळे स्वतः:च्या व मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. नोकरीत

कामाचा ताण वाढेल. वरिष्ठ नाराज होतील. त्यामुळे मानहानी होणे संभवते. कोणाशी पटणार नाही. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप व मानहानी होण्याची शक्यता आहे. अशा चीड येणाऱ्या परिस्थितीत काही मंडळींचा मनावर ताबा राहिला नाही तर गुन्हेगारी वृत्ती उफाळून येईल. जपा. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात बुध -गुरु=शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने परिस्थितीत सुधारणा होईल. पण या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी असलेला नेपच्यून ग्रह आध्यात्मिक उपासनेस व गूढ संशोधन कार्यास अनुकुल होईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळींना अपेक्षित अशी उत्तम नोकरी मिळू शाकेल. काहींना मानपसंत असे आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडाविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग्य आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने अचानक धनलाभ होईल. धनस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. श्रद्धा असेल तर "श्रीशिवोपासना" व "श्रीहनुमान उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषानी "ओम नम: शिवाय" मंत्राचा तर स्त्रियांनी "ओम शिवाय नमः:" मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच रात्री झोपण्यापूर्वी "हनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करावे.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींची शनि ग्रहाची साडेसाती संपण्यास काही महिन्यांचाच काळ शिल्लक आहे. त्यामुळे सतत सहनशील बनून आचरण करा. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना नोकरीत या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. नोकरीत कामाचा ताण, त्यामुळे मानसिक ताणही बळावेल. त्यात पुन्हा मनासारखे काही न घडणे, इच्छा अपूर्ण राहणे, नोकरीत वरिष्ठांचा आणि घरी वडील व्यक्तीचा विरोध सहन करावा लागेल. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणे संभवते. विशेष करून पोटाचे अनारोग्य त्रस्त करण्याची शक्यता दिसते. तुलनात्मक दृष्टीने पाहता महिन्याचा पूर्वार्ध काही प्रमाणात अनुकुल होईल. मंगळ ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी अनारोग्यकारक असून वर्तमान उष्ण वातावरण असल्याने उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करील. जपा. काही मंडळींना मूळव्याधीसारखा आजार होणे संभवते. तसेच पाणी, वीज यांपासून धोका असल्याने जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहू नका. विजेवर चालणारी उपकरणे सावधानतेने व काळजी घेत हाताळा . अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. वाहन नियंत्रित वेगानेच चालवा. वाहन चालविताना मोबाईलवर वार्तालाप करू नका. हाडमोड होण्याचा धोका संभवतो. महिन्याच्या उत्तरार्धात शक्यतो प्रवास करूच नका. त्रास, मानहानी होण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने धनलाभ होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे वैवाहिक जीवनातील सुख समाधान लाभेल. ज्यांची प्रेमप्रकरणे असतील त्यांचे प्रेमविवाह होणे संभवते. बुध ग्रह . महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल; तर उत्तरार्धात प्रतिकुल होईल व वाद, भांडणे, अडथळे निर्माण करील. बौद्धिक, शैक्षणिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना गुरु ग्रह अनुकुल , प्रगतिकारक व लाभदायक होईल. लेखन कलेत यश मिळेल. धनस्थानी असलेले शनि -केतू कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करण्याची दाट शक्यता आहे. तसेच

आर्थिक चिंता निर्माण करतील. आर्थिक संकटे येणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्षल ग्रह शास्त्रीय संशोधन कार्यास पूरक होईल; पण सतत अति विचार केल्यास डोकेदुखी, मेंदूविकार असे आजारही निर्माण करील. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या नेपच्यून ग्रहामुळे गृहसौख्यात बाधा येईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर २१ वेळा "ओम गं गणपतये नमः:" मंत्राचा जप करा. तसेच रात्री झोपण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या प्रथम स्थानी याच हा राशीत शनि व केतु असे दोन ग्रह आहेत. पैकी केतू ग्रह फारसा प्रतिकुल नसला तरी वाहनापासून धोकादायक आहे. म्हणून रस्त्याने सतत सावधानतेने चाला. तसेच वाहनचालक असाल तर नियंत्रित वेगानेच वाहन चालवा. वाहन चालवताना मोबाईलवर वार्तालाप करू नका. जपा. पण येथील शनि ग्रह मात्र अनारोग्यकारक असून स्वतः:च्या तसेच जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. काही मंडळींच्या कुटुंबातील प्रिय जनांचे स्थलांतर झाले तर चैन पडणार नाही. नियोजित कार्यात अडथळे निर्माण होतील. त्यामुळे नैराश्य येण्याची शक्यता आहे. जपा. काही जण दूरच्या प्रवासाला जातील. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे अध्यात्मात रुची असणारांना अध्यात्मिक उपासनेद्वारे मन:शक्ती प्राप्त होईल. तसेच हा नेपच्यून गूढ संशोधनाची मनापासून आवड असणारांना अनुकुल व प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळींना जलप्रवासाची संधी मिळेल; तर काहींना परदेशगमनाची संधी मिळू शकेल. या राशीच्या पंचम स्थानी असलेला हर्षलसारखा चिकित्सक ग्रह असल्यामुळे बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न आहेत अशांना प्रगतिकारक होईल. प्रेमात पुढाकार घेईल. सर्व प्रकारच्या कलावंत मंडळींना कलेतील प्रगतीस अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल , प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. पण या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या शुक्रामुळे एखाद्या कलेचे, विषयाचे सखोल ज्ञान व उच्च गुणवत्ता असूनही त्याचा उपयोग करण्याची योग्य संधीच मिळणार नाही. त्यामुळे मनस्ताप होईल व नैराश्य येईल. शुद्ध प्रेमभावना नसेल तर प्रेमात सफलता मिळणार नाही. उलट त्यामुळे काही मंडळी व्यसनाधीन होण्याची शक्यता वाटते. शिवाय . नको ते आळ येण्याची शक्यता असते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या मंगळ - बुध - राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. पतिपत्नीतील वाद, भांडणे, दोघांपैकी कोणाचे अनारोग्य, अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळणार नाही. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ - बुध या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर मंगळामुळे कुटुंबांत कोणाचे अनारोग्य , वाद, भांडणे होणे संभवते. उष्णताविकार बळावतील. कोणाला मूळव्याधीचा तर कोणास दुखापत होऊन हाडमोडीचा आजार त्रस्त करील. वीज, पाणी यांपासून धोका असल्याने विजेवर चालणारी उपकरणे काळजीपूर्वक वापरा. जलप्रवास करू नका. . खोल पाण्यात पोहू नका. पण बुध ग्रह यशदायक होईल. या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे अध्यात्मात प्रगती करणे सहज शक्य होईल. सामाजिक कार्याची आवड असणारांना हाती घेतलेल्या कार्यात प्रगती करणे सहज शक्य होईल. श्रद्धा असेल तर श्री गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल, दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुगुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव चंचल, अस्थिर, लहरी असा झाला असण्याची शक्यता वाटते. अशा परिस्थितीत आर्थिक व्यवहार अत्यंत जपून करा. आर्थिक घोटाळे होणे, आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची चिंता त्रस्त करणे, मनस्ताप, मानहानी होणे, अशापैकी घटना घडणे संभवते. काही मंडळी कोर्ट प्रकरणात अडकली जाण्याची शक्यता आहे. काही मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. स्वाभाविक दोषामुळे कोणाशी पटणार नाही. आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. सतत कसली ना कसली तक्रार त्रस्त करील. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या नोकरदार मंडळींना वरिष्ठ अधिकाऱ्याचा जाच सहन करावा लागेलसे दिसते. काही मंडळींना शारीरिक अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. काहींना संतति विषयक समस्या त्रस्त करील. मनस्थिती अस्वस्थ असल्याने व त्यात अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. काही मंडळींच्या नातेसंबंधात दुरावा निर्माण होणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेला शुक्र ग्रह कोणत्याही कलाक्षेत्रात प्रगती करण्यास अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात उष्णता विकाराचे आजार त्रस्त करतील. काहींना पोटविकार त्रस्त करील. जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील गैरसमज, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय , मतभेद. अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. राहूमुळे हितशत्रू पराजित होतील. ज्यांचा इतर जातिधर्माच्या लोकांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होणे संभवते. विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या लाभस्थानी असलेला गुरु अनुकुल असून इच्छा आकांक्षा काही प्रमाणात पूर्ण होतील. काही मंडळींना वाहनसुख मिळेल. विवाहेच्छूंना विवाहयोग संभवतो. काहींना नवे मित्र मिळतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्याने सतत मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण करा. त्यामुळे होणारा मनस्ताप सुसह्य होईल. श्रद्धा असेल तर दररोज नियमितपणे :हनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करा. गुरु ग्रहाच्या धनु राशीत शनि ग्रह असल्याने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या अतिशय कोमल झाली असावी, असे वाटते. तसेच मानसिक संवेदनाही अति शीघर होत असल्या पाहिजेत. तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहिरे नैराश्य येत असले पाहिजे. या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनारोग्यकारक असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता आहे. अपेक्षित गोष्ट साध्य होण्यात अडचणी, अडथळे येऊन दिरंगाई होण्याची शक्यता दिसते. पण उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काही भाग्यवान मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल; तर काही मंडळींना मानसन्मान होण्याचे योग संभवतात. तसेच दलाली, कमिशनवर व्यवसाय असणारांना सुद्धा काळ लाभदायक होईल. या राशीच्या काही मंडळींना गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे नवे कार्यक्षेत्र मिळेल; तर काही भाग्यवंत मंडळींचे वरिष्ठ अधिकारी कौतुक करतील. कौटुंबिक जीवनात स्वतःच्या आणि कुटुंबातील कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. शिवाय मुलांपैकी कोणाची आचरणविषयक समस्या मनस्ताप देण्याची शक्यता आहे.जपा. महिन्याच्या पूर्वार्धात सतत

सावधानतेने आचरण करा. कशाही प्रकारे अपघात होणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. शुक्र ग्रह शेती व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास होणे संभवते. शारीरिक उष्णता बळावून ताप येणे, फोड येणे, रक्तविकार बळावणे, अशापैकी आजार होणे संभवते. आर्थिक नुकसान किंवा चोरी होणेही संभवते. जपा. बौद्धिक, शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा उत्तरार्ध प्रगतिकारक व आभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेले शनि -केतू ग्रह वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना लाभदायक होतील. प्रवासयोगही संभवतो. श्रद्धा असेल तर "शिवोपासना व श्रीहनुमान उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज नियमितपणे एक माळ "ओम नमः: शिवाय" मंत्राचा एक माळ जप करा. तसेच रात्री झोपण्यापूर्वी "हनुमानचालीसा" स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अति अस्थिर, चंचल झाली असल्याचे जाणवते. त्यामुळे अविचाराने विचित्र आचरण होत असावे, असेही वाटते. कोणी काही बोलले वा विचारले तर आपल्या अविचारी फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत असण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होणार असल्याने त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साध्य करून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. त्याला शुक्र ग्रहाची उत्तम साथ मिळू शकेल. काही मंडळींना धनलाभ होईल, तर काहींना मान, प्रतिष्ठा असे काही मिळणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण महिन्याचा पूर्वार्ध कौटुंबिक सुख व गृहसौख्य या दृष्टीने मनस्तापकारकच असल्याचा अनुभव येईल. कुटुंबात असमाधानकारक घटना घडण्याची शक्यता दिसते. वाद, भांडणे, गैरसमज, धनाचा अपव्यय अशापैकी कारणांनी मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. हाती घेतलेल्या कामात अपयश येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात संततिविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे अयोग्य आचरण अशापैकी कारणाने मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे आध्यात्मिक उपासनेस काळ अनुकुल आहे. उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे व मन:शांती मिळवणे शक्य होईल. प्रगतीच्या नव्या संधी मिळतील. प्रवासयोग संभवतो. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या शनि -केतुमुळे व्यावसायिकांच्या व्यवसायात क्रान्तिकारक घटना घडणे संभवते. काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसा विचारही करू नये. आहे ती नोकरीच मनापासून करावी. नोकरीतील कामात दुर्लक्ष झाल्यास दुर्दैवाने कामावरून बडतर्फ होण्याची पाळी येणेही संभवते. जपा. या राशीच्या व्ययस्थानी असलेला नेपच्यून ग्रह गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण इतरांना चिंताग्रस्त ठेवेल. आपली राशी गुरुदेव दत्तात्रेयाच्या स्वामित्वाची असल्याने श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना
करा. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====